# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००२८९**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (आस्था-४)**
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, १ ला मजला
२५ मर्झबान पथ फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (जि.प.आस्था)**
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, १ ला मजला
२५ मर्झबान पथ फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलदिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०९.२०२१ | ०८.१०.२०२१ | ०७.११.२०२१ | १९.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २७.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०८.१०.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १३.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी विभागीय आयुक्त, नाशिक यांना सादर केलेल्या अहवालाची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.१०.२०२१ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थीना कळविले की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून कोणताही अहवाल प्राप्त झाल्याचे कार्यासनाच्या अभिलेखावरुन आढळून आलेला नाही. अपिलार्थीचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.०७.११.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०१.२०२२ रोजी अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती ग्रामविकास विभागाच्या स्तरावरुन उपलब्ध नाही असे नोंदवून प्रथम अपील फेटाळले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, अपिलार्थीना उपलब्ध माहिती दि. ०८.१०.२०२१ रोजी दिलेली आहे.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थींना दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ११.०७.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई